मुले कळतात सहजच, मुलांचे निरीक्षण केल्याने,
त्यांची नैसर्गिक हालचाल, वागणे, रडणे, हसणे
त्यांचे वाढणे, वाढता वाढता शिकणे, आणि
शिकता शिकता वाढणे.

मुले कळतात, आपणहून व्यक्त होतात, त्यांचे ऐकल्याने,
त्यांचे नैसर्गिक उर्मीतून बोलणे, वेळोवेळचे म्हणणे,
त्यांचे घडलेल्या घटना वर्णन करून सांगणे, आणि
सांगता सांगता वाढणे.

मुले कळतात, नेमकेपणाने, त्यांना खास वेळ दिल्याने,
त्यांच्या वेळोवेळच्या गरजा, त्या त्या वेळच्या मर्यादा
त्यांच्या अपेक्षा, सतत शिकत राहण्याच्या प्रेरणा आणि
त्यांच्या तीव्रव्यक्त भावना.

एका वाढत्या विश्वाचे साक्षी होताना जागरूक राहावे,
एका शिकत्या वयाचे आधार बनताना, उदार व्हावे
मुलांना हवे असतो आपण त्यांच्या स्वतंत्र घडणीसाठी,
आपण केंद्रबिंदू असतो त्यांच्या आयुष्य उभारणीसाठी !

२९.१.२०१९